# मुंबई विद्यापीठ

## जाहिर प्रकटन

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र. युएनआय/विद्या. अधिनियम/२०१६/बैठक/अधी-३/विशि-१/६५२९ दिनांक २ जून २०१७ च्या अनुषंगाने अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरूंची विभागाच्या अन्य अधिका-यांसह आयोजित आढावा बैठक दिनांक ८ जून २०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली व मा. राज्यमंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे उपस्थितीत पार पडली.

सदर बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या प्राचार्य, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि नोंदणीकृत पदवीधरांना याद्वारे कळविण्यात येते की, नावनोंदणी/मतदार यादी तयार करण्यासाठीची मुदत वाढविण्याबाबत कोणाचीही मुदत वाढीची मागणी मंजूर करता येणार नाही.

ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरलेल्या अर्जाची प्रत मुंबई विद्यापीठाच्या निवडणूक विभाग कक्ष क्र. ११०, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. येथे जमा करावी अन्यथा आपला ऑनलाईन भरलेला अर्ज वैध ठरवला जाणार नाही.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत प्रत्यक्ष येऊन विद्यापीठात जमा करू शकत नसेल त्यानी ती प्रत साधा टपाल, स्पीड पोस्ट अथवा कुरीअरने दिनांक ३० जून, २०१७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत उपरोक्त पत्त्यावर पोहचतील या बेताने पाठवावेत आणि सहकार्य करावे.

मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : १७ जून, २०१७.

कुलसचिव
(डॉ.एम.ए.खान)

# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव, प्राध्ययापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र यांना असे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ६२ नुसार मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवरील नोंदणीकृत पदवीधर मतदार संघातील दहा नोंदणीकृत पदवीधरांच्या निवडणूकीकरिता नावनोंदणी प्रक्रिया दिनांक १ जून,२०१७ पासून ३० जून, २०१७ पर्यंत सुरू राहणार आहे.

यासंदर्भात विद्यापीठाने दिनांक ३१ मे,२०१७ आणि १७ जून, २०१७ रोजी जाहीर प्रकटन प्रसिध्द केलेले आहे. (प्रत संलग्न) अधिसभेच्या निवडणूका ही घटनात्मक बाब असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार निवडणूका त्वरित घ्यावयाच्या असल्याने आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र आपल्या कार्यालयात असतील व ते विद्यार्थ्यांस दयावयाचे राहीले असतील तर ते संबंधित विद्यार्थ्यास त्वरित देण्यात यावेत. तसेच निवडणूकीबाबत वेळोवेळी विद्यापीठाने जाहीर केलेले प्रकटन/विविध प्राधिकरणाची परिपत्रके आपल्या महाविद्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात यावी.

मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : २४ जून, २०१७.

कुलसचिव
(डॉ.एम.ए.खान)

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य,मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक, स्वायत्त संस्था/ महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य,शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव,प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र.

---------------

क. नि.वि./१३९/२०१७ मुंबई - ४०० ०३२. दिनांक - २४ जून, २०१७

प्रत माहिती करीता रवाना :-

१) संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ,
२) नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री
३) समन्वयक, विद्यापीठ संगणक केंद्र,
४) उपकुलसचिव,(सा.प्र.वि) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विद्यानगरी
५) उपकुलसचिव (वित्त व लेखा) परिक्षाभवन,विद्यानगरी
६) उपकुलसचिव (वित्त व लेखा) फोर्ट
७) उपकुलसचिव, (सा.प्र.वि) फोर्ट
८) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, रत्नागिरी.
९) सुरक्षा अधिकारी, फोर्ट व विद्यानगरी परिसर
१०) स्वीय सहाय्यक १)कुलगुरू,२)प्र-कुलगुरू,३)कुलसचिव,४) संचालक,महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ